## जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

वाचा:-1) साथ रोग प्रतिबंध कायदा 1897 चे कलम 2,3 व 4
2) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005

जा.क्र.२०२०/आ.व्य./कावी/966
दिनांक:-२ एप्रिल २०२०

**आदेश :-**

**विषय:**- सर्व प्रकारच्या प्रसारमाध्यमाव्दारे (प्रिंट मिडिया/इलेक्ट्रॉनिक मिडिया/ समाज माध्यमे) कोरोना आजाराबाबत अफवा पसरविणाऱ्यावर कारवाई बाबत--

ज्याअर्थी, शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.त्या अन्वये जिल्हाधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्रात कोरोना (कोव्हीड-१९) नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

त्याअर्थी, मी, जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, लातूर मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून असे आदेशित करीत आहे कि, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 67 नुसार कोरोना विषाणु आजाराबाबत (कोव्हीड-१९) प्रसार माध्यमव्दारे (प्रिंट मिडिया/इलेक्ट्रॉनिक मिडिया/ समाज माध्यमे) यांनी कोणत्याही प्रकारचे वृत्त अधिकृतपणे जिल्हा माहिती अधिकारी यांच्या मार्फत आल्याशिवाय प्रसिध्द करु नये. कोरोना आजाराबाबत व्यक्ती/ रुग्ण् कोरोना पॉझिटिव्ह, निगेटिव्ह व संशयीत असल्याबाबतची बातम्या प्रसार माध्यमांनी अधिकृत माहिती शिवाय देऊ नये.

प्रसार माध्यमातील अशा वृत्तामुळे जिल्हयातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे सर्व प्रसार माध्यमांनी कोरोना विषाणु आजाराबाबत अधिकृत यंत्रणेकडून माहिती घेऊनच वृत्त प्रसारीत करावीत. अन्यथा आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५४ नुसार संबंधीत अफवा पसरविणा-या विरुध्द कारवाई करण्यात येईल

सदरील आदेश दिनांक २ एप्रिल २०२० ते १४ एप्रिल २०२० मध्यरात्रीपर्यंत अंमलात राहतील.या आदेशाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करुन तात्काळ आदेशाचे पालन न करणाऱ्या प्रसारमाध्यमे साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियमन २००५ मधील तरतुदी नुसार कारवाईस पात्र राहतील.

सदर आदेश आज दिनांक २ एप्रिल २०२० रोजी माझे सहीनीशी निर्गमित करण्यात आले आहे.

(जी.श्रीकांत) भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**लातूर**

**प्रति,**

**सर्व प्रसार माध्यमे, लातूर जिल्हा**

OPPO F9 Pro · ©Sunil